# आदिवासी नागली विकास कार्यक्रम, नाशिक

## शेतकरी प्रशिक्षण हस्त पुस्तिका




प्रगती अभियान

**नोंदणीकृत पत्ता :** 'उर्जस', प्लॉट नं. ७, रविकिरण कॉलनी, चेतनानगर, नाशिक – ४२२ ००९.

Ph. : 0253 - 2370397; E-mail : pragati.abhiyan@gmail.com; Website : www.pragatiabhiyan.org



## नागली विकास कार्याक्रमाविषयी :

नागली हे आदिवासी लोकांचे आहारातील अतिशय महत्वाचे घटक आहे. तसेच शास्त्रीयदृष्ट्या सुद्धा नागली आरोग्यासाठी अतिशय लाभदायी असल्याचे निदर्शनास आलेले आहे. आज शहरी जीवनशैलीमुळे उत्पन्न होणाऱ्या आजारांना आळा घालण्यासाठी नागली हे उत्तम गुणधर्म असलेले अन्न म्हणून उपयुक्त ठरलेले आहे. असे असले तरी मागील काही दशकांत नागलीचे क्षेत्र झपाट्याने घटत असल्याचे अभ्यासातून निदर्शनास आले. अधिक माहिती मिळवली असताना असे लक्षात आले कि सतत होणारा कीड-रोगांचा प्रादुर्भाव हे नागलीला पर्यायी पिके घेण्याचे प्रमुख कारण असल्याचे लक्षात आले. तसेच घटत जाणाऱ्या उत्पन्नामुळे शेतकऱ्यांनी नागली पिकाकडे पाठ फिरवली आहे.

म्हणूनच प्रगती अभियान, नाशिक या संस्थेने आरआरए नेटवर्क आणि आदिवासी विकास विभागाच्या सहयोगाने 'आदिवासी नागली विकास कार्यक्रम' हाती घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत नागली प्रात्यक्षिकात सहभागी शेतकऱ्यांसाठी ही नागली पिकाची हस्तपुस्तिका उपयुक्त ठरेल अशी अशा !!!

# बिजामृत बनवून वापरण्याची पद्धती




५ किलो गायीचे शेण कापडात बांधून
२० लिटर पाणी असलेल्या बादलीत
१२ तास बुडवून ठेवा




५० ग्राम चुना + १ लिटर पाणी
(एक रात्र मिश्रण तसेच ठेवा)



दुसऱ्या दिवशी कापडातील शेणाचा
अर्क बादलीमध्ये पिळून घ्या




शेण अर्क असलेल्या पाण्यात
मुठभर माती मिसळा




त्यानंतर ५ लिटर गोमुत्र + चुन्याचे द्रावण
बादलीतील द्रावणात मिसळा



५० मिली. द्रावण + १ किलो बियाणे
(व्यवस्थित लाऊन बियाणे सावलीत
वाळवून पेरणी करा)


# गादी वाफा तयार करण्याची पद्धत



पावसाआधी जमिनीची खोल
नांगरट करून घ्यावी



कुळवाच्या २-३ पाळ्या देऊन जमीन
भुसभुशीत करावी.




अश्या जमिनीवर १ मीटर रुंद, ३ मीटर लांब
आणि १५ सेमी उंच गादी वाफा बनवावा.



वाफा करताना २ घमेले शेणखत किवा
गांडूळखत आणि ५० ग्राम सुफला मिसळावे

# निम अर्क वापरण्याची पद्धत



शिकाऱ्या पाण्याने
स्वच्छ धुवून घ्या



किडींचा प्रादुर्भाव दिसल्यास ३ मिली प्रति लिटर
याप्रमाणे पंपात घ्यावे

**✻ निम अर्क आणि पाणी व्यवस्थित गाळून घ्यावे**
**✻ औषध लहान मुलांपासून लांब ठेवावे**
**✻ औषधाच्या बाटलीवरील सुचेनुसार काळजीपूर्वक वापर करावा**




फवारणी एकसारख्या गतीने करावी आणि वाऱ्याच्या
विरुद्ध दिशेने फवारणी करू नये

**✻ प्रत्यक्ष फवारणी करताना डोळे व त्वचा झाकली जाईल अशी काळजी घ्यावी**



फवारणी करून झाल्यावर शिकाऱ्या स्वच्छ
धुवून ठेवावा तसेच हात - पाय आणि चेहरा
स्वच्छ धुवून मगच इतर कामे करावी

# नागली रोप मुख्य शेतात पुनर्लागवड



# जीवामृत बनवून वापरण्याची पद्धती



२० लिटर पाणी





त्यामध्ये १ किलो शेण +
अर्धा (१/२) लिटर गोमुत्र हे
एकत्र करा







त्यात २०० ग्राम गुळ +
२०० ग्राम डाळीचा चुरा +
१ मुठ वारुळाची/पिंपळाच्या
झाडाखालची माती



४८ तास सावलीत तसेच ठेवा
(२-३ वेळा मिश्रण हलवा)



थेट पाण्याद्वारे देता येते



१० लिटर पाण्यात
१ लिटर गाळून
घेतलेले द्रावण मिसळून
फवारणी करा

# मटका खत



१ किलो शेण



२ लिटर गोमुत्र



५0 ग्राम गुळ



निम १ किलो, करंज १ किलो आणि
रुई पाने १ किलो घ्या



(पाने कापून सर्व द्रावण व्यवस्थित मडक्यात एकत्र करा. मडके प्लास्टिकने बंद करून १0 दिवस ठेवा आणि दर २ दिवसांनी हलवा)

**१ लिटर द्रावण : ४० लिटर पाणी या प्रमाणात फवारा.**

# रोग आणि उपाय : करपा



करपा रोग





२ किलो

+



१० लिटर

२ कि.१० लि.
बेल किवा तुळस पाने  २ किलो
+
कोमट पाणी  १० लिटर
(२ तास द्रावण ठेवावे)



* १५ दिवसांच्या अंतराने ३ वेळा फवारणी करावी

# रोग आणि उपाय: तपकिरी ठिपके



तपकिरी ठिपके
पावसाची ओढ किवा
अन्नद्रव्य कमतरतेमुळे



१ लिटर



५ लिटर

१ लिटर गोमुत्र + ५ लिटर पाणी

* सकाळी किवा संध्याकाळी फवारणी करावी



१ किलो



१० लिटर

१ किलो शेण (एक आठवडा जुने)
+
१० लिटर पाणी

* सकाळी किवा संध्याकाळी फवारणी करावी


# रोग आणि उपाय: मावा





## मावा रोग

उपाय १ मित्र कीटकांचा वापर





शेतात गुळाचे पाणी शिंपडावे.
मुंग्या आकर्षित होऊन मावा
कीड खातील किंवा
पिठ्या ढेकुण पिकामध्ये सोडावे

उपाय - २ मित्र वनस्पती




झेंडू किवा इतर फुलझाडे
मुख्य पिकासाठी कुंपण म्हणून लावा.

उपाय - ३ निम अर्क








३ मिली. / लिटर पाण्यात
घालून फवारणी करणे

# रोग आणि उपाय: खोड कीड



**खोड कीड**

**उपाय – १ निम अर्क**








निम अर्क ३ मिली
+
पाणी १ लिटर या प्रमाणात फवारणी

**उपाय २ – अळी/सुरवंट रॉकेलने नष्ट करणे**







रॉकेल खोड किड बाधीत क्षेत्र + रॉकेल दोरी

खोडकीड बाधित शेतात रॉकेल मिसळून, पिकावर दोरी फिरवून अळी/
सुरवंट रॉकेलमिश्रित पाण्यात पाडून नष्ट करावेत

*** शेतात रॉकेल+पाणी तुंबलेले असावे**

# निंदनी: मनुष्यबळाने किंवा सायकल विडर



प्रत्यक्ष मनुष्यबळ
असल्यास निंदनी करणे.
✻(तन नाशक वापरू नये)



सायकल विडर -
या यंत्राच्या सहाय्याने निंदनी करता येते. एक व्यक्ती याच्या सहाय्याने संपूर्ण शेताची निंदनी करू शकतो

# बीज निवड आणि सोंगणी



**बीज निवड**

शेताच्या मध्यावर जाऊन संपूर्ण वाढ झालेले गोंडे निवडावे. त्याची मळणी करून कडक उन्हात वाळवावे. हवाबंद प्लास्टिक पिशवीत शिवून साठवणगृहात ठेवावे.



**सोंगणी**

७०% पिकाची पाने पिवळी पडल्यावर सोंगणी करावी. त्यानंतर सोंगणी केलेले पिक व्यवस्थित वाळवून घ्यावे आणि साठवावे.

**सहकार्य – Revitalising Rainfed Agriculture Network आणि सहभागी शेतकरी कुटूंब**

**मार्गदर्शक – आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन**

# प्रगती अभियान

**नोंदणीकृत पत्ता :** ‘उर्जस’, प्लॉट नं. ७, रविकिरण कॉलनी, चेतनानगर, नाशिक – ४२२ ००९.
Ph. : 0253 - 2370397; E-mail : pragati.abhiyan@gmail.com; Website : www.pragatiabhiyan.org